

शनिवार दि.३१ ऑगस्ट२०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०१ अंक : ३६१

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!

पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी

दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)

अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !

संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 www. lokneta.com


# पालघर येथे तिसरे विमानतळ उभारा:उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे मोठी मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पालघर (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंत्रीमंडळाच्या पहिल्याच बैठकीत वाढवण बंदराच्या कामास मंजुरी दिली आहे. पालघर येथे त्यांनी बोलताना वाढवण बंदरामुळे होणाऱ्या फायदांचा पाढाच वाचला. या प्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाची मागणी पंतप्रधान मोदींकडे केली आहे. पालघरमध्ये तिसरे विमानतळ सुरु करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारताला पुढे नेण्याचे काम मोदींनी केले आहे असे हे बंदर पाहून लोक म्हणतील. जगातील सर्व एअरपोर्ट रिक्लमेन्शन करून तयार केले आहे. येत्या काळात मुंबई वाढणार आहे. वसई विरार वाढणार आहे. आपण बंदराचे रिक्लेमेन्शन करणार आहोत. या ठिकाणी एअरपोर्टचेही रिक्लेमन्शन केले पाहिजे. या ठिकाणी तिसरे विमानतळ झाले तर महाराष्ट्र अधिक पुढे जाईल, अशी अपेक्षा देवेंद्र फडणवीस यांनी केली.वाढवण बंदराबद्दल बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुंबई आणि हा सर्व भाग देशाची आर्थिक राजधानी झाला. कारण मुंबई पोर्ट आणि जेएनपीटी पोर्ट आहे. त्यामुळे आपण नंबर वन ठरलो. आता त्यापेक्षा तिप्पट मोठे बंदर वाढवणमध्ये होत आहे. या बंदरामुळे पुढील ५० वर्ष महाराष्ट्र नंबर वन राहील. हे केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे होणार आहे. १९८० च्या दशकात वाढवण बंदर करण्याचे स्वप्न पाहिले गेले होते. पण ते २०२४ मध्ये प्रत्यक्षात उतरत आहे. मोदी यांचे सरकार आले आणि वाढवण बंदर सुरू करण्याच्या कामाला वेग आला. कोर्टाच्या नोटिफिकेशनमधून वाढवण बंदर बाहेर आले. नरेंद्र मोदी यांनी त्याला नॅशनल पोर्टचा दर्जा दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहेत. पालघर येथे ७६ हजार कोटी रुपयांच्या वाढवण बंदर प्रकल्पाच्या भूमीपूजनासाठी ते आले. त्यावेळी काही स्थानिकांकडून या बंदराला विरोध होत असल्याचे लक्षात घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भूमिका मांडली. अजित पवार म्हणाले की, वाढवण बंदरामुळे परिसराचा चौफेर विकास होणार आहे. मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. विकासासाठी थोडी पावले मागे पुढे जावे लागणार आहे. परंतु मी तुम्हाला आश्वासन देतो वाढवण परिसरातील एकाही व्यक्तीला वाऱ्यावर सोडणार नाही.



# महाराष्ट्रात वाढत्या महिला अत्याचाराबाबत कठोरात कठोर कायदा करून आरोपींना कडक शासन करा

## ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे जिल्हा सचिव राजेंद्र मोरे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**

महाराष्ट्र मध्ये महिलांवर अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे त्याचबरोबर मुलीवर सुद्धा अत्याचार मोठ्या प्रमाणात होत आहे त्यामुळे महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था राहिली की नाही असा प्रश्न निर्माण होत असून महिलांची सुरक्षितता मजबूत व दोषी असणाऱ्या आरोपींना कठोरात कठोर शिक्षा करावे असे मागणे ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीच्या वतीने संस्थापक अध्यक्ष दादासाहेब केदारे



यांच्या मार्गदर्शनाखाली चिखली तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्याकडे निवेदन देण्यात आले, ३० ऑगस्ट रोजी सदर तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले असून निवेदनामध्ये नमूद करण्यात आले की सध्या घडलेल्या घटनेमुळे महिलांच्या मनामध्ये मुलींच्या मनामध्ये कमालीचे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे महिला काम करण्याकरता कुठेही जात नसून सरकारने बस स्थानक होस्टेल इतर ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावावे त्याचबरोबर अत्याचारांच्या घटना रोखण्यासाठी कठोरात कठोर कायदा करून आरोपींना कडक शासन करावे अशी मागणी सुद्धा यावेळी करण्यात आली,यावेळी निवेदन देताना ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे विदर्भ उपाध्यक्ष सचिन खंडारे,ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे जिल्हा सचिव राजेंद्र मोरे,ग्राहक उपभोक्ता संरक्षण समितीचे जिल्हा उपाध्यक्ष बबन सरकटे आधी यावेळी उपस्थित होते .

## मालवण येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची दुर्घटना झाल्याने

# राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा पवार) गटाच्या वतीने सेनगाव तहसीलदारांना निवेदन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव महादेव । हरण**

सेनगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मालवन राजकोट कील्यावर उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा दुर्घटना च्या निषेधार्थ सेनगाव तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूतळ्याची दुर्घटना अत्यंत निंदनीय असून शासनाने जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर कडक कारवाई करून या ठिकाणी नव्याने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य दिव्य पुतळा भरावा अशी मागणी यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष विकासराव शिंदे यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले



यावेळी अतीक अक्तर पुसेगावकर मोहम्मदअत्तीक, विकास पोले ,साहेबराव हराळ ,वसंत जाधव, चंद्रमुखी गायकवाड, नितीन चाटसे, यांच्या सह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते व शिवप्रेमी उपस्थित होते.

## अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयामध्ये

# सेंद्रिय शेती आणि फूल शेती प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**जुन्नर । मयूर ढोबळे**

दि.२९ ऑगस्ट रोजी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अण्णासाहेब वाघिरे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, ओतूर, येथे वनस्पतीशास्त्र विभागाने सेंद्रिय शेती आणि फुलांची शेती या विषयावर जनजागृती आणि प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमामध्ये वनस्पतिशास्त्राचे २५ विद्यार्थी, तसेच बचत गटामधील १५ महिला शेतकरी सक्रियपणे सहभागी झाले. याशिवाय ८ शिक्षक आणि ७ शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदवला. विविध गटांना एकत्र आणून शाश्वत कृषी पद्धतींबद्दल त्यांची समज वाढवणे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट होते. कार्यक्रमाची सुरुवात उपप्राचार्य डॉ. आर एन शिरसाट यांच्या मार्गदर्शनपर भाषणाने झाली. रासायनिक खतांचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि सेंद्रिय शेतीचे महत्व याविषयी त्यांनी उद्बोधित केले. वनस्पतिशास्त्र विभागामधील डॉ. एस आर मीर यांनी शेतीमधील रासायनिक पद्धतींच्या अतिवापराने मानवी आरोग्य आणि पर्यावरणावर होणारे घातक परिणाम या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामध्ये रासायनिक खते मातीची क्षारता कशी वाढवू शकतात, झाडाच्या वाढीवर नकारात्मक परिणाम करतात आणि मातीची भौतिक रचना कशी खराब करतात हे मुख्य मुद्दे समाविष्ट होते. याव्यतिरिक्त, या खतांच्या वापरामुळे जमिनीत जड धातू साठू शकतात, जे वनस्पतींद्वारे शोषले जातात आणि शेवटी मानवी अन्न साखळीत प्रवेश करतात, ज्यामुळे गंभीर आरोग्य धोके निर्माण होतात. यानंतर सहभागींना सेंद्रिय शेती आणि फुलशेतीच्या तत्त्वांची



ओळख करून देण्यात आली. रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करून हरितगृह वायू उत्सर्जन कमी करणे, निरोगी माती राखणे आणि जैवविविधता जतन करणे यासारख्या सेंद्रिय शेतीच्या पर्यावरणीय फायद्यांवर या सत्रात प्रकाश टाकण्यात आला. सेंद्रिय शेती प्रदूषण पातळी कमी करून आणि अन्न उत्पादनांमधील रासायनिक अवशेष कमी करून मानव आणि प्राण्यांसाठी आरोग्य धोके कमी करून पर्यावरणीय आरोग्य राखण्यास मदत करते. शिवाय, पारंपारिक शेती पद्धतींशी संबंधित खर्च कमी करून शाश्वत कृषी उत्पादनास प्रोत्साहन देते हे पटवून दिले. या सैद्धांतिक परिचयानंतर बायोफर्टिलायझर्स, विशेषत: किचन कंपोस्टिंग आणि संजीवनी अमृत तयार करण्यावर प्रशिक्षण देण्यात आले, ज्यामुळे सहभागींना त्यांनी शिकलेल्या गोष्टींचा व्यावहारिक जीवनात वापर करण्यास नक्कीच उपयोग होईल असे प्रतिपादन केले.

सदर कार्यक्रमास रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. आर एन शिरसाट, प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही डी जाधव,वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी आर हांडे आणि पदार्थ विज्ञान विभागप्रमुख डॉ. बोराटे तसेच इतर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी श्री सुरेश थोरात तसेच प्रयोगशाळा सहाय्यक विद्या आढारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# काँग्रेसचे आमदार जितेश आंतापूरकर भाजपात प्रवेश





लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

देगलूर बिलोली मतदारसंघाचे काँग्रेसचे आमदार जितेश आंतापूरकर यांचा भाजपमध्ये ३० ऑगस्ट रोजी मुंबई येथे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, खासदार अशोकराव चव्हाण, खासदार प्रताप पाटील चिखलीकर, माजी आमदार राम पाटील रातोळीकर, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नांदेड व्यंकट पाटील गोरेगावकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये मुंबई येथे काँग्रेसचे आमदार जितेश आंतापूरकर यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश झाला आहे जितेश आंतापूरकर व झिशन सिद्धकी यांनी विधान परिषद निवडणुकीमध्ये क्रॉस वोटिंग केल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली होती देगलूर बिलोली मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव मतदारसंघ असल्यामुळे या ठिकाणी स्वर्गवासी रावसाहेब अंतापुरकर हे आमदार झाले होते त्यांच्या दुखद निधनामुळे त्यांच्या जागी काँग्रेस पक्षाने त्यांना उमेदवारी देऊन निवडून आणले होते परंतु त्यांनी काँग्रेस पक्षाची एकनिष्ठ राहिले नसल्यामुळे काँग्रेस पक्षाने हाकालपट्टी केली व तसेच अशोकराव चव्हाण यांचे जितेश अंतापुरकर हे निकटवर्ती असल्यामुळे जितेश अंतापुरकर हे भाजपमध्ये प्रवेश केले आहेत.

# श्री संत जेठालाल महाराज सभा मंडपाकरिता वीस लक्ष रुपयाचे आ.मुटकुळे यांच्या हस्ते भूमिपूजन



लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव महादेव । हरण**

सेनगाव तालुक्यातील पुसेगाव येथे श्री संत जेतालाल महाराज मंदिरासमोर २०लक्ष रुपयाचे भूमिपूजन करण्यात आले यावेळी हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या स्थानिक निधीमधून श्री संत जेतालाल महाराज मंदिरा समोरील जागेमध्ये सभा मंडपाचे भूमी पूजन करण्यात आले यावेळी भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते तर यावेळी आमदार तानाजीराव मुटकुळे यांना बंजारा भगिनींनी आमचे लाडके भाऊ म्हणून राख्या बांधण्यात आल्या हिंगोली विधानसभेवर असेच कार्य करत राहावे हिंगोली विधानसभेमध्ये विकास व्हावा अशी मागणी यावेळी बंजारा समाजातील महिलांनी केली आहे, गेल्या दहा वर्षापासून हिंगोली विधानसभेवर आमदार तानाजीराव मुटकुळे यांनी अनेक विकास कामे करून अनेकांचे मने जिंकली असल्याने बंजारा समाजाकडून आमदार मुटकुळे यांचे जंगी स्वागत करण्यात आले, यावेळी के के शिंदे,ता अध्यक्ष हिम्मतराव राठोड, शंकरराव बोरुडे, हरिश्चंद्र शिंदे, नारायण बाबा राठोड, भुजंग महाराज, विजय धाकतोडे, रामदास चव्हाण, विष्णू राठोड, विश्वनाथ पवार, व आधी बंजारा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## चारोळी

उगाच पोकळ अपेक्षा कशास
जीवनी रंग स्वतःच भरावा
खडतर वाटा येतच राहतील
सुविचारांचा नको दुरावा.

रंजना सानप
मायणी (सातारा)

झाडे लावा झाडे जगवा



# मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील शिवरायांचा पुतळा कोसळल्याच्या निषेधार्थ लिंबागणेश येथे रास्तारोको

## दोषींवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाईची शिवप्रेमींची मागणी–डॉ.गणेश ढवळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा ४३ फुट उंचीचा पुतळा निकृष्ट दर्जाच्या कामामुळे ८ महिन्याच्या कालावधीत कोसळला असुन यामुळे शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या असुन शिवरायांची अवमानना व निकृष्ट दर्जाचे काम करणारे शिल्पकार तथा मेसर्स आर्टीस्ट्री कंपनीचे प्रोपरायटर जयदीप आपटे, स्ट्रक्चरल कन्सल्टंट चेतन पाटील व संबंधित संस्थांना काळ्या यादीत टाकुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करून कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी आणि या ठिकाणी शिवरायांचा दर्जेदार पुतळा उभारण्यात यावा या प्रमुख मागणीसाठी शिवप्रेमी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२९ गुरुवार रोजी सकाळी अहमदपूर ते अहमदनगर राष्ट्रीय महामार्गा वरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश बसस्थानक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी आंदोलनात शिवशक्ती भिमशक्ती विचार मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, विक्की आप्पा वाणी,अशोकराजे वाणी, औदुंबर नाईकवाडे,करण वायभट, सचिन आगवान, अक्षय वाणी,अशोक थोरात,रामदास फाळके, हरिओम क्षीरसागर, महावीर वाणी, विवेक बागल, गहिनीनाथ वाणी, नाना वाणी,अजिम शेख, विलास काटे,अभिजित गायकवाड,सुरेश निर्मळ,शहादेव धलपे, विनोद चौरे, संतोष वाणी,भरत वाणी, आण्णा जाधव, दगडु ढवळे , कृष्णा पितळे, गजानन रंदवे, भास्कर ढास, महावीर वाणी, पिंपरनई सरपंच बाळासाहेब वायभट, कृष्णा वायभट,रवी वायभट, रेवण येडे, बळीराम येडे, विशाल येडे, नितीन येडे, दत्ता जाधव, कमलाकर काटवटे,खदीर पठाण, गणेश कागदे ,अक्षय कुदळे,वरद जोशी ,चेतन कानिटकर, महेश ढवळे, बळीराम येडे आदि सहभागी होते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथील राजकोट येथील किल्यावर नौदल दिनानिमित्त दि.४ डिसेंबर २०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ( चबुतरा बांधकाम १५ फुट आणि त्यावर २८ फुट पुतळा) एकुण ४३ फुट उंचीच्या पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण पंतप्रधान नरेंद्र



मोदी, संरक्षणमंत्री राजनाथसिंह, तत्कालीन राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्या उपस्थितीत झाले होते.पुतळा सुशोभीकरण आणि इतर व्यवस्थेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग कणकवली कार्यालयाने सुमारे ५ कोटी रुपये खर्च केले होते.

मालवण मधील सार्वजनिक बांधकाम उपविभागाने २० आगस्ट २०२४ रोजी नौदलाचे विभागीय सुरक्षा अधिकारी कमांडर अभिषेक कारभारी यांना पत्र पाठवून पुतळ्याच्या नट बोल्ट यांनी गंज पकडला असुन पुतळा विद्रुप दिसत आहे.तेव्हा संबंधित शिल्पकारांना सांगुन कायमस्वरूपी उपाययोजना तात्काळ करण्यात यावी असे कळविले होते मात्र याकडे दुर्लक्ष करण्यात आले. दि.२६ आगस्ट २०२४ रोजी हा पुर्णाकृती पुतळा कोसळुन पडल्याची धक्कादायक घटना घटली असुन निकृष्ट दर्जाच्या कामामुळे अवघ्या ८ महिन्यात हा पुतळा कोसळला असुन यामध्ये शिवरायांचा अवमान झाला असुन याबद्दल शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या असुन तिव्र संतापाची भावना असुन जयदीप आपटे शिल्पकार तथा मेसर्स आर्टीस्ट्री कंपनीचे प्रोपरायटर आणि स्ट्रक्चरल कन्सल्टंट चेतन पाटील यांच्या संस्थांना काळ्या यादीत टाकुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करून कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी.आणि याच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा दर्जेदार पुतळा दिमाखाने उभारण्यात यावा.

छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज संभाजी राजे भोसले यांनी पंतप्रधानांनी उद्घाटन करण्यासाठी घाईगडबडीत उभारलेला पुतळा कोसळला,मुळातच आकारहीन व शिल्पशास्त्रास अनुसरून नसलेला हा पुतळा बदलावा म्हणून पंतप्रधान यांच्याकडे दि.१२ डिसेंबर २०२३ रोजी पत्राद्वारे मागणी केली होती. तसेच स्थानिक लोकांनी पुतळ्याच्या निकृष्ट कामाबद्दल प्रशासनाकडे तक्रार केली होती मात्र याची दखल घेण्यात आलेली नाही त्यामुळे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे दिसून येत असुन सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

# जुनी पेन्शन योजना व इतर मागण्यांसाठी परळी नगर परिषदेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटना यांच्या वतीने पुकारण्यात आलेल्या नगरपरिषद कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करावी तसेच त्यांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करावी आदी प्रमुख मागण्यासाठी परळी नगर परिषदेच्या अधिकारी संवर्ग व कर्मचाऱ्यांनी आजपासून बेमुदत संपास सुरुवात केली आहे .या संपामुळे नगर परिषदेचे कामकाज ठप्प झाल्याचे चित्र दिसून आले.



याबाबत अधिक माहिती अशी की, महाराष्ट्र राज्य नगर परिषद संवर्ग अधिकारी संघटना यांच्यावतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, तसेच गृहमंत्री, उपमुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाच्या अंतर्गत येणाऱ्या नगरपरिषद, नगरपंचायतीमध्ये २००५ नंतरच्या अधिकारी व कर्मचारी यांना अद्याप राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. तसेच जुनी पेन्शन योजना बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे जुनी पेन्शन योजना लागू करावी. संघटनेच्या निवेदनातील समस्या व ज्या काही मागणी आहेत त्या मागण्या राज्य सरकारने पूर्ण कराव्यात, राज्यसंवर्ग पदे सातवा वेतन आयोग अधिसूचनेत पदांचा समावेश करून सेवार्थ नंबर देण्यात यावा, नगरपरिषद कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना १०,२०,३० लागू करावी, पदोन्नती मधील कोट्यातील रिक्त पदे तात्काळ भरावीत या व इतर मागण्यांसाठी राज्यभर आज दिनांक २९ ऑगस्ट पासून राज्यव्यापी बेमुदत संप पुकारण्यात करण्यात आला आहे. या संपात परळी नगर परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. नगरपरिषद कार्यालयासमोर उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ठिय्या मांडून या आंदोलनात सहभाग घेतला आहे. दरम्यान राज्य सरकारने नगरपरिषद कर्मचारी व अधिकाऱ्यांचा हा प्रश्न तात्काळ न सोडविल्यास नागरिकांना मात्र अनंत अडचणींना सामोरे जावे लागणार आहे.

# मौजे अटकळी येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची १०४ वी जयंती उत्साहात साजरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील मौजे अटकळी येथे साहीत्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सविस्तर वृत्त असे की प्रथमतः सकाळी ठिक १० वाजता महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, लहुजी साळवे,साहीत्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे दिपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण प्रमुख मान्यवर यांच्या हस्ते करून अभिवादन केले.तसेच आमदार जितेश अंतापुरकर यांच्या मातोश्री शिवलीला ताई यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडला.लगेच विशेष सत्कारमूर्ती विस ते पंचवीस वर्षे शैक्षणिक क्षेत्रात अटकळी वासीयांना शिक्षणाच्या माध्यमातुन विद्यार्थी घडवणारे प्रिय शिक्षक रुमाले सर यांचा मूलगा रविकुमार उत्तमराव रुमाले यांची पि.एस. आय.पदी व शेवाळा येथील रहिवासी असलेले प्रितम कुंद्रे यांची पण नाशिक



येथे पि.एस.आय.पदी नियुक्ती झाल्याबद्दल जंयती मंडळाच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला.नुकतेच प्रमुख मार्गदर्शन म्हणून लाभलेले पि. एस. आय.कुंद्रे यांनी सांगितले की जिद्द चिकाटी मेहनत खचुन न जाता अभ्यास केला पाहिजे यश हवे असेल तर मेहनत घेतली पाहिजे असे प्रतिपादन केले.रामतीर्थ पोलिस ठाण्याचे बिट जमादार यांनी मोबाईलचे फायदे व नुकसान यांवर सकारात्मक माहीती दिली.यावेळी कार्यक्रमांचे अध्यक्ष अटकळी गावचे उपसरपंच रनवीर पाटिल डोंगरे, सरपंच प्रतीनीधी शिवाजी डोंगरे,सोसायटी चेअरमन बजरंग बत्तलवाड,माजी सरपंच प्रल्हाद मुंडकर,माजी सोसायटी चेअरमन भगवान जाधव,रामतीर्थ पोलिस ठाण्याचे बिट जमादार जांभळीकर व त्यांचे सहकारी,दत्तु पाटील बोंगाळे,गणपत पोलकमवाड, राजेश पोलकमवाड,सुधीर वाघमारे,अमोल शेरे, पत्रकार विलास शेरे,उत्तम बत्तलवाड,आयुब पटेल,भास्कर भालेराव ,अकाश रानवळकर,शिवाजी गायकवाड, परमेश्वर गायकवाड,संजय गायकवाड,राजु सुर्यवंशी, धोंडीबा सुर्यवंशी,सचिन गायकवाड,हरीचंद गायकवाड,माधव सुर्यवंशी,आदी उपस्थित होते.सुत्रसंचालन शिवाजी गायकवाड आभार शिंवलीग गायकवाड यांनी केले.सायकांळी ठिक ९.०० वाजता लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व महामानव क्रांतीसुर्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच प्रतीनीधी शिवाजी पाटिल डोंगरे, यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.शाहीर बाबुराव गाडेकर हदगाव व गायीका मनिषा कांबळे परभणी यांचा प्रबोधनात्मक गायनांचा कार्यक्रमाचा आस्वाद समाज बांधवांनी घेतला.

# डॉ.सुवर्णा कराड यांच्या एम्पॉवरिंग वीमेन: ए बिगिनर'स गाइड पुस्तकाचे प्रकाशन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे । ज्ञानेश्वर बुधवत**

अहमदनगर येथे आयोजित वंजारी महासंघाचे राज्यस्तरीय साहित्य संमेलन एका महत्त्वपूर्ण घटनेचे साक्षीदार ठरले. वंजारी महासंघ महिला आघाडीच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा, डॉ. सुवर्णा कराड यांच्या लेखणीतून उतरलेल्या एम्पॉवरिंग वीमेन: ए बिगिनर'स गाइड या पुस्तकाचे प्रकाशन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तक प्रकाशन सोहळ्याला वंजारी समाजाच्या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली होती. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संगीता घुगे होत्या तर डॉ. गजानन सानप हे या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे होते. याप्रसंगी मंचावर लेखक विचारवंत गणेश खाडे, रेणुकाताई वराडे, राजकुमार आघाव अर्जुन वायभासे कवी




वा. ना. आंधळे, मल्हार खेडकर, आदी मान्यवर उपस्थित होते.

एम्पॉवरिंग वीमेन: ए बिगिनर'स गाइड हे पुस्तक महिला सक्षमीकरणाच्या दिशेने मार्गदर्शन करणारे एक महत्वाचे साधन ठरले आहे. या पुस्तकात महिलांना त्यांच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासोबतच त्यांच्या स्वावलंबनाच्या प्रवासाला प्रेरणा देणारे विचार आहेत. डॉ. सुवर्णा कराड यांनी आपल्या अनुभवांचा आणि ज्ञानाचा उपयोग करून महिलांच्या सक्षमीकरणासाठी एक अत्यंत प्रभावी मार्गदर्शक तयार केले आहे.पुस्तक प्रकाशनानंतर उपस्थित मान्यवरांनी डॉ. सुवर्णा कराड यांच्या कार्याचे आणि त्यांच्या लेखणीचे कौतुक केले. त्यांच्या लेखणीतून महिला सक्षमीकरणाच्या दिशेने नवा विचार, नवी ऊर्जा मिळाल्याचे मान्यवरांनी अधोरेखित केले. संमेलनातील महिला साहित्यिकांनी आणि श्रोत्यांनी या पुस्तकाचे स्वागत केले आणि ते आपल्या दैनंदिन जीवनात उपयोगात आणण्याची प्रतिज्ञा घेतली.साहित्य संमेलनातील हा सोहळा वंजारी समाजासाठी एक ऐतिहासिक क्षण ठरला आहे. डॉ. सुवर्णा कराड यांच्या नेतृत्वाखाली, वंजारी महासंघ महिला आघाडी महाराष्ट्राने साहित्य, समाजसेवा आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात एक नवीन मानदंड स्थापित केला आहे.



**आष्टी येथे माजी आमदार भीमराव धोंडे साहेब यांच्या मार्गदर्शना खाली भव्य राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन सोहळाचे उद्घाटन संपन्न झाले. या वेळी क्रांतिकारी शिक्षक संघटने तर्फे माजी आमदार भीमराव धोंडे यांचा सत्कार करण्यात आला. (छाया–लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)**

# खानवटे येथे चोरट्यांचा धुमाकूळ,एकाच रात्रीत पाच ठिकाणी केल्या घरफोड्या

## ग्रामसुरक्षा यंत्रणा चालू करण्यासाठी ग्रामपंचायत उदासीन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

खानवटे तालुका दौंड हे गाव दौंड,इंदापूर,करमाळा,कर्जत या चार तालुक्याच्या आणि पुणे,सोलापूर,अहिल्या नगर(अहमदनगर) या तीन जिल्ह्याच्या हद्दीवर वसलेले असून या ठिकाणी गावाच्या तिन्ही बाजूने भीमा नदीच्या पाण्याचा वेढा आहे.हे गाव तसे सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय भक्कम आहे.कारण गावाच्या तिन्ही बाजूने पाणी असल्यामुळे चोरट्यांना सहसा लपता येत नाही आणि पळून जाता येत नाही.तरी देखील खानवटे येथे गुरुवारी (दिनांक २९) एकाच रात्री ठिक ऐक वाजण्याच्या सुमारास पाच ठिकाणी घरफोडया करून चोरट्यांनी धुमाकूळ घातला.येथील शालन हनुमंत कांबळे,धनश्री लक्ष्मण कन्हेरकर,जवाहर ढवळे–पवार,महालिंग दिगंबर शीलवंत आणि नितीन भिमराव कोलते.यांच्या घरी





कडी–कोयंडे तोडून कटावणीने दरवाजा उचकटुन घरफोडीचे प्रकार घडले आहेत.यातील दोघांच्या घरातील रोख रक्कम आणि सोने चोरीला गेले आहे.

धनश्री कन्हेरकर यांच्या घरातील ८०००/ रुपये आणि शालन कांबळे यांच्या घरातील दिड तोळे सोने येवढा ऐवज चोरीला गेला आहे. अशी प्राथमिक माहिती उत्तमराव गायकवाड यांनी दिली. चोरीच्या प्राथमिक चौकशीकामी दौंड पोलीस स्टेशनचे पोलिस सुभाष राऊत व नितीन चव्हाण आले होते.यावेळी त्यांच्यासोबत पोलीस पाटील उर्मिला गायकवाड,उत्तमराव गायकवाड हे देखील उपस्थित होते.त्यांनी घडलेला सर्व प्रकार पोलीसांना सांगितला.

यावेळी माजी सरपंच मच्छिंद्र पोटफोडे म्हणाले की गावात ग्रामसुरक्षा यंत्रणा चालू असल्यावर संपूर्ण गावाला रात्री एकाच वेळी फोन केल्यावर गावातील ग्रामस्थ जागे होतात,त्यामुळे चोरीसारखे प्रकार रोखण्यास चांगली मदत होते.या ग्रामसुरक्षा यंत्रणामुळे एकाच वेळी तिन हजार लोकांना फोन जातो आणि जो गावाच्या हिताचा मेसेज,निरोप असेल तो सर्वांना एकाच वेळी मिळतो.त्यामुळे गावातील लोकांना चांगल्या–वाईट गोष्टींची माहिती तात्काळ मिळते.त्यामुळे ग्रामसुरक्षा यंत्रणा चालू होणे अतिशय गरजेचे आहे

> ग्रामसुरक्षा यंत्रणा चालू करण्यासाठी वेळोवेळी सरपंच आणि ग्रामसेवक यांच्याशी चर्चा केली असून ग्रामपंचायतीने तात्काळ ग्रामसुरक्षा यंत्रणा चालू करावी.
> **उर्मिला गायकवाड,पोलीस पाटील खानवटे.**

> गावातील तरुणांनी एकत्र येऊन गस्त घालने गरजेचे आहे.ग्रामसुरक्षा यंत्रणा चालू करण्यासाठी निधीची कमतरता आहे.परंतु लवकरच ग्रामपंचायतच्या सर्व सदस्यांबरोबर चर्चा करून मार्ग काढू.
> **संतोष कांबळे ग्रामविकास अधिकारी खानवटे.**

> ग्राम सुरक्षा यंत्रणा चालू करण्यासाठी सर्व सदस्य यांच्याशी चर्चा करून लवकरच ग्रामसुरक्षा यंत्रणा चालू करू.
> **–वैभव लोखंडे, उपसरपंच खानवटे.**

# थोर विचारवंतांचे विचार रुजले तरच जयंती साजरी केलेले सार्थकी ठरते-संदीप मारोतराव पाटील कवळे





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

दुर्गानगर तांडा ता उमरी येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष नायगाव मतदार संघाचे युवा नेते संदीप पाटील कवळे यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रम पार पडला.

यावेळी संदीप पाटील कवळे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर बोलत असताना, आपण स्वतःसाठी तर करतोच पण ज्या समाजामध्ये जन्मलो त्या समाजाच पण काही देणं लागतो त्यासाठी प्रत्येक युवकांनी चांगले विचार आचार करून एखादी जयंती साजरी करून मिरवणूक काढण्यापेक्षा थोर पुरुषांचे विचार डोक्यामध्ये रुजविले पाहिजेत असे व्ही.पी.के.उद्योग समुहाचे सीईओ संदीप मारोतराव पाटील कवळे यांनी प्रतिपादन केले.

दुर्गानगर येथे जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून जयंती साजरी केली ही खूप मोठी अभिमानाची बाब आहे.पुढे संदिप पाटील कवळे यांनी विचार मांडताना कुठल्याही समाजसुधारकांची जयंती साजरी करत असताना त्या ठिकाणी मुख्य म्हणजे त्यांच्या जीवनावर व्याख्यान झाले पाहिजे कारण तो काळ तर सोशल मीडियाचा नव्हता आज तो सर्वांना तो उपलब्ध आहे. यूट्यूब च्या माध्यमातून आपल्याला अनेक पुस्तकांचे वाचन करता येतं अशा अनेक गोष्टी आपल्याला त्यामधून शिकण्यासाठी मिळतात चांगले विचार स्मरणार्थ ठेवायचे दुष्ट विचार कधीच मनात येऊ देऊ नका,वेसनाच्या आहारी न जाता तरुण पिढींने दुर राहिले पाहिजे आताचे युग हे स्पर्धेचे युग आहे त्यासाठी यश आपल्या पदरी पाडायचं

झाले तर त्या स्पर्धेत उतरून आपले आर्थिक साध्य करणे काळाची गरज आहे असे शेवठी म्हणाले.

यावेळी या कार्यक्रमाला उपस्थित कळगाव चे माजी सरपंच बालाजी पाटील डांगे, उमरी बाजार समितीचे संचालक व्यंकटराव पाटील केसगिरे, युवक काँग्रेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष हनुमंत पाटील बेंद्रे, दुर्गा नगरचे सरपंच सुरेश दादा जाधव, श्रीराम हैबतकर, पत्रकार आनंद राठोड,गोविंद राठोड, तांड्यातील कारभारी व नाईक तसेच या जयंती मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व शाळेतील विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

### सकल मराठा समाज उमरा सर्कल घ्या वतीने

## मारतळा येथे शासनाचा व ठेकेदाराचा जोडे मारून जाहीर निषेध

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



दि.३० ऑगस्ट २०२४ रोजी मारतळा येथे सिंधुदुर्ग येथील राजकोट किल्ल्यांवरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा इंडियन नेव्ही च्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने राज्य शासनाने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आठ महिन्यापूर्वी पुतळा उभारण्यात आला होता. या शासनाच्या राज्यकर्त्यांच्या हलगर्जीपणामुळे त्यांच्या मर्जीतल्या ठेकेदाराला ठेकेदारीचे काम दिल्यामुळे त्यांनी पुतळ्यास अतिशय निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरून बनविल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा खाली कोसळला आहे.त्यामुळे याचा जाहीर निषेध करण्यासाठी मारतळा येथे सकल मराठा समाज उमरा सर्कल च्या वतीने सबंधित ठेकेदार व सरकार चा जोडे मारुन जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.यावेळी भास्करराव पाटील शिंदे जोमेगावकर,बंडू पाटील ढेपे, किरण पाटील गव्हाणे, उध्दव पाटील ढेपे, संतोष पाटील वडवळे,माधव पाटील वडवळे, जनार्दन पाटील वडवळे, मोहनराव पाटील सिरसाट, शिवव्याख्याते मधुकर महाराज बारूळकर, चक्रधर पाटील शिंदे, अंकुश पाटील कोल्हे,हनमंत पाटील ढगे, हणमंत पाटील सावळे, विलास पाटील येडे, विनायक पाटील भरकडे तसेच अनेक शिवप्रेमी सकल मराठा समाज उपस्थित होते.

## जोमेगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

### सभापती विक्रांत पाटील शिंदे यांच्या हस्ते विविध विकास कामाचे उद्घाटन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**



तालुक्यातील जोमेगाव येथे साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा युवा नेते विक्रांत पाटील शिंदे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे व सर्व महामानवांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले, यावेळी सभापती शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सभापती विक्रांत शिंदे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सर्व समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या, यावेळी लोहा कंधार मतदार संघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या विकास निधीतून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह लक्ष व सी.सी. रस्त्यासाठी २५ लक्ष रुपयाचा निधी दिला होता,लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृहाचे लोकार्पण व सी. सी रस्त्याचे भूमिपूजन यावेळी सभापती विक्रांत पाटील शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना सभापती शिंदे म्हणाले की आमदार शामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून जोमेगाव येथील अनेक वर्षापासून ची प्रलंबित विविध विकास कामाला एकूण निधी या पाच वर्षाच्या काळात ६४ लक्ष रुपयांचा भरीव निधी देऊन ही कामे आमदार शिंदे यांनी दर्जेदार पद्धतीने पूर्ण केली असून यापुढेही उमरा सर्कलमधील मूलभूत विविध विकास कामासाठी आमदार शिंदे यांच्या माध्यमातून भरीव निधी दिला जाणार असल्याची ग्वाही यावेळी सभापती शिंदे यांनी बोलताना दिली, यावेळी शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले याप्रसंगी जोमेगावच्या सरपंच श्रीमती कमलबाई संभाजी शिंदे,माजी सरपंच आदिनाथ पाटील जोमेगावकर,माजी सरपंच पुरभाजी शेटे, माजी सरपंच कोंडीबा गव्हाणे,ग्रामपंचायत सदस्य साईनाथ पाटील,अंताजी शेटे, रोजगार सेवक मनोहर भुरे,शालेय समिती अध्यक्ष बालाजी पाटील, पोलीस पाटील मारुती पांचाळ, जयंती मंडळाचे अध्यक्ष माधव गव्हाणे, सचिन गव्हाणे, संजीव गव्हाणे, सह गावकरी, जयंती मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नाकर्तेपणा मुळे श्रीगोंदा येथील मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक घाणीच्या विळख्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा येथील दुय्यम निबंधक कार्यालय हे २०२३ मध्ये नव्या इमारती मध्ये स्थलांतरित झाले आहे.या पुर्वी जुन्या तहसिल आवारात मुद्रांक विक्रीचा व्यवसायासाठी शेडची व्यवस्था होती व त्या शेडमध्ये मुद्रांक विक्री व दस्त लेखनिक व्यवसाय करीत होते. मुद्रांक विक्री हि मा. दुय्यम निबंधक यांचे अधिपत्याखाली येत असल्याने व दुय्यम निबंधक कार्यालय नवीन जागेत स्थलांतरित झाल्याने मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक यांची नवीन इमारतीमध्ये सोय होणे गरजेचे असताना नवीन इमारती शेजारील जागेत शेडची व्यवस्था होणे गरजेचे असताना त्या कडे जाणीव पूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याने मुद्रांक विक्रेते, दस्तलेखनिक व नागरिकांची मोठीं हेळसांड होत आहे. मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक हे बसत असलेल्या ठिकाणी श्रीगोंदा पोलीस स्टेशनची मुतारी,शौचालय आहे ते सुद्धा अस्वछ आहे मुद्रांक विक्रेते व ग्राहकांना तोंडाला रुमाल लावून थांबावे लागते . घाणीमुळे त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात डासांची पैदास झाल्याने त्याच्या मुद्रांक विक्रेते,दस्तलेखनिक व नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे . याबाबत मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक श्री. मिलिंद पंडित कुलकर्णी, श्री. गोरख शंकर कविटकर, श्री. भारत माधवराव सुर्यवंशी, श्री. अर्जुन अंकुश मडके व बालेमियाँ अब्दुल करीम जमादार यांनी खासदार निलेश लंके,




आमदार बबनरावजी पाचपुते, माजी खासदार सुजय विखे मा. जिल्हाधिकारी सो, अहमदनगर, मा. सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर, मा. तहसिलदार साहेब, श्रीगोंदा व मा. दुय्यम निबंधक साहेब, श्रीगोंदा यांच्याकडे वारंवार निवेदन देऊन पाठपुरावा केला आहे. या इमारतीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागकडे असल्याने इमारतींच्या मोकळ्या जागेत शेड करण्यासाठी दुय्यम निबंधक श्रीगोंदा यांनी मा.उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग श्रीगोंदा श्री होके साहेब यांना पत्र देऊनही याकडे मा.उप अभियंता श्री होके हे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याने मुद्रांक विक्रेते, दस्तलेखनिक व नागरिकांची मोठी हेळसांड व अवहेलना होत आहे आत्ता तरी मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनिक यांची घाणीच्या विळख्यातून उप अभियंता श्री होके साहेब सुटका करणार का या कडे संपूर्ण तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

## सुरंगळी येथे संत शिरोमणी सेनाजी महाराज यांची पुण्यतिथी वृक्ष रोपण करून मोठ्या उत्साहात साजरी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील सुरंगळी येथे ग्राम पंचायत कार्यालय मध्ये राष्ट्र संत शिरोमणी सेनाजी महाराज यांची पुण्यतिथी निमित्त प्रतिमेचे पुजन करून याथोर संतांच्या पुण्यतिथी निमित वृक्षारोपण करण्यात आले यावेळी सरपंच सौ अंशुकुमारी रामेश्वर दांडगे , उपसरपंच विनोद जाधव, ग्रामसेवक संजय पांजगे ,विश्वनाथ पाटील, मोतीराम दांडगे, सेवानिवृत्त लिपिक रामभाऊ वानखेडे संतोष काळे,एकनाथ भराड, योगेश जाधव,शिवाजी दांडगे,पत्रकार सुभाष वरपे,राहुल जाधव,समाधान वरपे, प्रल्हाद नेवरे,सुरेश लोखंडे , संदीप दांडगे ,यावेळी नाभिक समाजातील आजी माजी पदाधिकारी अशोक वरपे, लाईनमन संजय सुराशे, प्रा.राजु वरपे,किसन वरपे, हरी वैद्य , शंकर वरपे ,कीरण सुराशे, संतोष केकाळ ,सुधाकर वरपे,कडुबा सोनुने, संजय वरपे, गजानन वानखेडे अरूण गवळी,धनशाम बोर्डे,सारंगधर जाधव,शे मुश्ताक ,रवी वैद्य, सुधाकर वैद्य,योगेश सुराशे, वानखेडे अरूण गवळी,धनशाम बोर्डे,सारंगधर जाधव,शे मुश्ताक ,रवी वैद्य, सुधाकर वैद्य,योगेश सुराशे, वानखेडे शे मुश्ताक ,रवी वैद्य, सुधाकर वैद्य,योगेश सुराशे, ऋषी वरपे , ज्ञानेश्वर वरपे, प्रमोद वरपे, याच्यांसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी नाभिक समाजाच्यावतीने नाष्टाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थिताचे अभार संजय वरपे, विष्णू वरपे, मानले.

## प्रा.यानभुरे हे लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे समाजभूषण पुरस्काराने सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

प्रा.यानभुरे जयवंत सोपानराव कंधार तालुक्यातील दिग्रस बु येथील रहिवासी असलेले सध्या नांदेड शहरात वास्तव्यास असुन कोव्हिड - १९ च्या अगोदर व नंतर च्या काळात सामाजिक,शैक्षणिक व राजकीय,कला सांस्कृतिक, साहित्य,क्रीडा,तसेच वृत्तपत्रातील पत्रकारिता आणि कोविड काळातील ऑनलाईन अध्यापण कार्यपद्धती अशा या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या मुळेच, आशीर्वाद बहुउदेशीय सेवाभावी संस्था, महाराष्ट्र राज्य च्या वतीने लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ देऊन सन्मान करून गौरविण्यात आले,



यापूर्वी सुद्धा प्रा.यानभुरे जयवंत सोपानराव यांना इसवी सन २००७ मध्ये स्वामी रामानंद स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत युवा रंग यामध्ये उत्कृष्ट खेळाडू व क्रीडा पंच म्हणून सुद्धा पुरस्कार मिळाला होता इसवी सन २०१३ मध्ये नांदेड जिल्हा पोलीस नागरिक समन्वयक चषक यामध्ये द्वितीय पुरस्कार देऊन नांदेड जिल्हा पोलीस च्या वतीने सन्मानित करण्यात आले होते तसेच मीमांसा फाउंडेशन दैनिक समीक्षा, ह्यूमन राइट्स व मंथन क्रिएटिव्ह ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने सौ.अमिता ताई चव्हाण यांच्या वाढदिवसा निमित्ताने गुरूंचा सन्मान म्हणून क्रीडा मार्गदर्शक हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते,एवढेच नव्हे तर दैनिक अर्थ या वृत्तपत्राचे मुख्य संपादक एडवोकेट अनुप आगाशे यांच्याकडून भारतीय संविधान उद्देशिका हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले

याबरोबरच दैनिक चालू वार्ता या वृत्तपत्राकडून मुखेड येते उत्कृष्ट पत्रकार म्हणून सुद्धा गोल्ड मेडल व पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला एवढेच नव्हे तर ए.जे. फाउंडेशन कोल्हापूरच्या वतीने राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक रत्न पुरस्कार २०२१ हा सुद्धा देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला.

प्रा.यानभुरे यांनी सामाजिक कार्यात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक भव्य दिव्य स्वरूपात व्हावे म्हणून तशी संकल्पना २०१७ साली मांडली आणि कंधार तालुक्यातील दिग्रस बुद्रुक येथे अश्वारूढ शिवरायांचे स्मारक दिमागदार पद्धतीने उभे टाकले एवढेच नव्हे तर लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारक उभारणीसाठी पाठपुरावा केला,तसेच भारतीय घटनेचे शिल्पकार आधुनिक भारताचे जनक भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य दिव्य स्मारक उभारणीची ची पूर्णतः जबाबदारी कालकतीत विठ्ठलराव कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली गंगाधर वाघमारे यांच्या सहकार्याने सर्वांच्या सहकार्याने स्वीकारून ती सुद्धा पूर्ण २००४ मध्ये पूर्ण केली,आज दिग्रस बुद्रुक येथे भव्य दिव्य दिमाखदार पद्धतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक सर्वांची प्रेरणा म्हणून उभे टाकले आहे. याही पलीकडे जगत ज्योती क्रांतीसुर्य महात्मा बसवेश्वर यांच्या पूर्ण आकृती स्मारकाचे बांधकाम व्हावे यासाठी वारंवार ग्रामपंचायत कार्यालय दिग्रस कडे मागणी सुद्धा करीत आहेत अशा विविध कामातून धार्मिक व जातीय सलोखा जोपासण्याचे कार्य सुद्धा त्यांनी केले असून कोविड-१९ च्या काळात जवळपास विना मोबदला पूर्ण राशन धारकांना मोफत राशन वाटप करण्याचे मोठ्या प्रमाणात कोविडची तमा न बाळगता कार्य केले आहे.अशा त्यांच्या विविध कार्याचा आढावा घेऊन त्यांना या पुरस्काराने सन्मानित करून त्यांचा गौरव करण्यात आला आहे,त्यामुळे त्यांचे संस्थेच्या वतीने व प्रशासनाच्या वतीने सर्वत्र अभिनंदन करून कौतुक केले जात आहे.

# भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी दिल्या राम कृष्ण हरी वाजवा तुतारीच्या घोषणा

## इंदापूर मध्ये हर्षवर्धन पाटील यांना कार्यकर्त्यांनी तुतारी हाती घेण्यासाठी केली विनंती



लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

बावडा ता.इंदापूर येथे जनतेशी संवाद साधण्यासाठी माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील उपस्थित होते.यावेळी कार्यकर्त्यांनी त्यांना भाजप पक्ष सोडण्यासाठी विनंती केली.आणि भाजपच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यासमोरच भाजप पक्षाच्या पदाचा राजीनामा देत असल्याचे जाहीर केले.आणि आपण तुतारी चिन्ह हातात घेऊन निवडणूक लढवावी अशी विनंती केली.यावर लगेचच कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला.राम कृष्ण हरी वाजवा तुतारी जोरदार घोषणा देत हर्षवर्धन पाटील यांना विनंती केली की भाजप पक्षाच्या कमळ चिन्हावर आपल्याला अजिबात लढायचे नाही.
आपण तुतारी चिन्ह हाती घ्या आणि निवडणुकीला सामोरे जा,विजय आपला निश्चित आहे.असा सर्वच कार्यकर्त्यांनी सूर धरला आणि जोरजोरात घोषणा देऊ लागले.यावेळी तुतारी चिन्हाच्या घोषणा दिल्यानंतर कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असलेला पाहायला मिळाला.यावेळी तुतारीच्या घोषणा ऐकल्यानंतर हर्षवर्धन पाटील हे देखील स्मित हास्य करताना दिसून आले. परंतु लवकरच येणारा काळच ठरवेल इंदापूर विधानसभेची निवडणूक कशी होणार.आणि माजी. मंत्री हर्षवर्धन पाटील काय निर्णय घेणार याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# अजिंठा,बुलढाणा महामार्गावर वाढोना गावाजवळ दुचाकीला आयशर ट्रकची भीषण धडक दुचाकी स्वार युवक जागीच ठार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

काल दिनांक ३० ऑगस्ट २०२४ वार शुक्रवार रोजी दुपारी २:३० वाजेच्या सुमारास अजिंठा बुलढाणा या महामार्गावर वाढोना गावाजवळ आयशर ट्रकचा व दुचाकीचा भीषण अपघात झाला आहे या अपघातात दुचाकीस्वार २३ वर्षीय तरुण हा जागीच ठार झाला असल्याची घटना घडली आहे. याविषयी सविस्तर माहिती अशी की भोकरदन तालुक्यातील वाढोना येथील युवक सतीश घोरपडे २३ यांनी नुकतेच नवीन घर वाढोणा गावाशेजारी बांधले होते यावेळी आज त्याच्या घराची घरभरणी असताना गावातून किराणा दुकानातून काहीतरी किराणा सामान घेऊन तो घरी जात असताना आयशर क्रमांक चक १८ इ- ०१४२ हा भरधाव अजिंठा कडून बुलढाणा कडे जात होता यावेळीच रस्त्याच्या साईडने आपली दुचाकी घेऊन घरी जाणाऱ्या सतीशला या आयशर ट्रकने धडक दिली व या धडकेत युवकांला सुमारे २५ ते ३० फूट फरपटत नेले त्यानंतर हा आयशर ट्रक आसपासचे शेतकरी अपघात झाल्यानंतर धावल्यावर थांबला यावेळी अपघात झाल्याची कळताच त्यांनी घटनास्थळावरून पळ काढला. यावेळी स्थानिक नागरिकांनी या तरुणाला पाहिले असता तो आपल्या गावातील सतीश घोरपडे असल्याचे समोर आले त्या वेळी ग्रामस्थांनी त्याला रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला मात्र तोपर्यंत उशीर झाला होता व सतीश ने घटनास्थळावरच दम सोडला, या अपघाताची माहिती तात्काळ पारध पोलिसांना देण्यात आली पोलिसांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला आहे व ट्रक ताब्यात घेतला आहे, मात्र सुमारे अर्धा तास या तरुणाची बॉडी भर हायवे रोड पडून होती. परिणामी परिसरात हळ-हळ व्यक्त होत आहे.



# दिपभारती विद्यालय येथे थोर शास्त्रज्ञ अर्नेस्ट रुदरफोर्ड यांची जयंती साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

दिपभारती विद्यालय दानापूर येथे थोर शास्त्रज्ञ अर्नेस्ट रुदरफोर्ड यांची जयंती साजरी करण्यात आली .कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे शिक्षक श्री वाय एच कापरे व भोकरदन पंचायत समितीचे माजी सभापती इरफान पठाण यांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन केले व पुष्पहार अर्पण केले . अर्नेस्ट रुदरफोर्ड यांच्या जीवनावर विद्यालयाचे शिक्षक श्रीआर एस डापके यांनी त्यांच्या अल्फा ,बीटा ,गॅमा किरण व अणूकेंद्राचे कृत्रिम विघटन या शोधाविषयी माहिती दिली.याप्रसंगी विद्यालयातील शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .



# वारंगा फाटा येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०४वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी



लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव महादेव । हारण**

कळमनुरी तालुक्यातील वारंगा फाटा या ठिकाणी साहित्यरत्न लोकशाहीर डॉ, अण्णाभाऊ साठे यांची १०४ वीजयंती
दि २८/८/२४ रोजी वारंगा फाटा येथे लोकशाहीर साहित्य सम्राट डॉ अण्णा भाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती निमित्ताने लहुजी शक्ती सेना शाखेचे उदघाटन करण्यात आले या वेळी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हा अध्यक्ष संदेश शिखरे. मातंग ऋषी मंदिर येळेगांव तुकाराम. शिवाजी महाराज गजभारे. आर पी आय मराठवाडा संघटक दत्तराव गायकवाड. लहुजी शक्ती सेनेचे कळमनुरी ता अध्यक्ष केशव लांडगे. युवक जिल्हाध्यक्ष चेतन पाटोळे. जिल्हा संघटक संतोष साठे. कळमनुरी उप तालुका अध्यक्ष कळमनुरी विशाल गायकवाड. युवक तालुका अध्यक्ष हिंगोली अनिल ढोके. शाखा अध्यक्ष मारोती साठे. शाखा उपाध्यक्ष संजय सोनटक्के. शाखा सचिव उत्तम सोनटक्के. शाखा सहसचिव अजय सोनटक्के. कार्यध्यक्ष विनोद गजभारे. शाखा सल्लागार अक्षय गजभारे. शाखा संघटक अविनाश पवार. आदी महिला सह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी– श्री.रजनीकांत भोसले

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

सततच्या पावसामुळे आष्टी तालुक्यातील शेतीचे ;अतोनात नुकसान झाले आहे.यामुळे शेतकरी पुरते संकटात सापडले असून त्यांना सूर्यफूल; मूग सोयाबीन नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने राज्य शासनाच्या कृषी विभागाने नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामा करावा. तसेच, मागील वर्षी पंचनामे करून ही ज्या पुरग्रस्ताना नुकसान भरपाई मिळाली नाही त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी,अशा प्रकारची मागणी लोणी येथील भाजपा अनुसूचित जाती जमाती युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष श्री.रजनीकांत भोसले यांनी केली आहे.यावर्षी ऑगस्ट महिन्यात पावसाने भरपूर प्रमाणात शेतीचे नुकसान झाल्याने आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढावले आहे. त्यात पेरणीचे वेळी ऑगस्ट महिन्यात पावसाने संततधार सुरू केल्याने अनेक पिके पाणी साचून रोपे कुजली.त्यामुळे शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागला आहे.तरी,या नुकसान ग्रस्त शेतीचे पंचनामे करून शासनाने शेतकऱ्यांना आर्थिक सहकार्य करावे,अशी मागणी भाजपा अनुसूचित जाती जमाती युवा मोर्चाचे तालुका उपाध्यक्ष श्री.रजनीकांत भोसले यांनी केली आहे.



# धर्माबाद येथील बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत हुतात्मा पानसरे हायस्कूलचे खेळाडू प्रीती भीमराव राठोड प्रथम



लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

यशक्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी नांदेड
व ब्लेझ कॉम्बॅट आणि फिटनेस क्लब नांदेड मार्फत दिनांक २९ ऑगस्ट २०२४ जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत हुतात्मा पानसरे हायस्कूल चे खेळाडू सावली श्रीदास वाघमारे. रागिनी काशिनाथ पांचाळ. सृष्टी मारुती चपळे. शर्वरी दत्तात्रय सीतावार. गंगासागर बालाजी बागडेकर . दिव्या राजू येवतीवाड. तनुजा भुजंगराव सूर्यवंशी . शरयू दत्तात्रय सीतावार. भक्ती यादव डाकोरे . प्रीती भीमराव राठोड प्रथम क्रमांक प्राप्त करून विभागीय स्तरावर निवड व कार्तिकी नागनाथ कात्रे राजश्री रमाकांत बाजनवाड द्वितीय क्रमांक प्राप्त केल्याबद्दल. संस्थेचे अध्यक्ष श्री रामचंद्र पाटील बन्नाळीकर व सचिव श्री विश्वनाथराव पाटील बन्नळीकर कोषअध्यक्ष श्री राम पाटील बाळापुरकर संस्थेचे सर्व विश्वस्त तसेच मुख्याध्यापक श्री सन्मुख बेंबरेकर उप मुख्याध्यापक श्री रामेश्वर गायकवाड प्रयवेक्षक श्री मोहन पुलकंटवार. श्री नरेश जिदमवार व ग्रँड मास्टर दत्तात्रय सितावार क्रीडा शिक्षिका अंजली मडके माजी सैनिक क्रीडाशिक्षक संजय पंदिरवाड क्रीडा शिक्षक गणेश शिंदे शाळेतील वरिष्ठ शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे पालक सर्व क्रीडाप्रेमी अभिनंदन व कौतुक करत आहे.

# कृषी प्रदर्शनात शेतकऱ्यांसाठी मनोरंजनाच्या कार्यक्रम संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**



आष्टी येथे आयोजित राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनामध्ये सायंकाळच्या वेळी शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली.
याबाबत अधिक माहिती अशी की, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत श्री.छत्रपती शाहू,फुले,आंबेडकर,कृषि महाविद्यालय यांच्या वतीने व शेतकऱ्यांचे नेते माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून चार दिवसांच्या डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. रोज हजारों शेतकरी प्रदर्शनाचा लाभ घेत आहेत.शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते,लोककला, नाटक,शास्त्रीय संगीत,शेतकरी गीते,लोकनृत्य यांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. यामध्ये उदो उदो अंबाबाईचा, चलरे सर्जा चलरे राजा,आराधी गीत,याची सासू हरवली, गोंधळ गीत मल्हारी मार्तंड,आई जगदंबे,आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यावर आधारीत नाटीका, गोंधळ,झाशीची राणी,गोंधळ गीत-आई भवानी तुझ्या कृपेने,मर्दानी खेळ नाशिक ढोल,आराधी गीत,जोगवा गीत- लल्लाटी भंडार,देशभक्ती गीत, देवाक काळजी रे मल्हारी मल्हारी,तेलंगणा आदिवासी गीत आई गोंधळाला ये,आदिवासी गीत- आदिवासी राजा शेतकरी गीत-जोडीने पेरणी होऊ या गड्यांनो,देश रंगीला रंगीला इत्यादी वेगवेगळे गिते सादर केले.या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये पंडित नेहरु जुनिअर कॉलेज,श्रीराम विद्यालय,महेश विद्यालय रुईनालकोल,अन्न तंत्र महाविद्यालय,डी.फार्मसी महाविद्यालय,पंडित नेहरु विद्यालय,भगवान जुनिअर कॉलेज,जय भवानी विद्यालय , कानिफनाथ विद्यालय,बी. फार्मसी महाविद्यालय,छत्रपती, शाहू, फुले आंबेडकर कृषी महाविद्यालय,डिप्लोमा इन इंजिनियरिंग येथील महाविद्यालयांच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सहभागी होऊन उपस्थितांचा उत्साह वाढविला. कार्यक्रमास महिला व ग्रामस्थ विशेष करून युवा वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भोकरदन तालुकास्तरीय खो खो क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न





लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन येथील न्यू हायस्कूल या शाळेच्या मैदानावर तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये १४ वर्ष १७ वर्ष १९ वर्षे वयोगटातील मुला मुलींच्या खो-खोच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेचे उद्धाटन तालुका क्रीडा अधिकारी संजय गाढवे यांच्या हस्ते झाले तर कार्यक्रमाचे अध्यक्ष न्यू हायस्कूल शाळेचे प्राचार्य व्ही जी लाखे होते. या प्रसंगी तालुका क्रीडा संयोजक कृष्णा जंजाळ यांनी प्रास्ताविक केले.मागील वर्षी जवळपास १४००० खेळाडू सहभागी झाले होते याही वर्षी तालुक्यातील विविध शाळा महाविद्यालयातून जवळपास १२० पेक्षा जास्त संघ सहभागी झाले होते. १४ वर्षे मुलींमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाणेगाव यांनी विजय मिळविला, १७ वर्ष मुलींमध्ये दुर्गामाता विद्यालय सोयगाव देवी या संघाने विजय मिळवला, तर १९ वर्षे मुलींमध्ये मोरेश्वर उच्च माध्यमिक विद्यालय राजुर यांनी बाजी मारली. तसेच १४ वर्षे मुलांमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चांदई ठोंबरे यांनी विजय मिळवला. तर १७वर्षे मुलांमध्ये दुर्गामाता विद्यालय सोयगाव देवी यांनी विजय मिळवला, तर १९ वर्षे वयोगटांमध्ये रेणुका देवी उच्च माध्यमिक विद्यालय पिंपळगाव यांनी बाजी मारली . विजयी संघाचे भोकरदन तालुका क्रीडा कार्यालयाचे वतीने अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या .या स्पर्धा निरपेक्षपणे पार पाडण्यासाठी क्रीडा मार्गदर्शक किरण साळवे अजय मतकर व्हीएन पाटील कृष्णा जाधव भागवत राठोड भास्कर घुगे गजानन कड भास्कर कडवणे प्रदीप बोर्डे भाईदास वळवी भागवत राठोड यांनी परिश्रम घेतले प्राध्यापक अशोक नवगिरे गौतम खाडे यांनी पंच म्हणून कामगिरी बजावली

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904